**प्रेसनोट दि. ०६/०३/२०२३**

**पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाकडील वाहतुक शाखेमार्फत ड्रंक ॲण्ड ड्राईव्हची विशेष मोहिम राबविण्यात येणार असलेबाबत**

आज रोजी हिंदु रितीरिवाजाप्रमाणे होळीचा सण असुन उदईक दिनांक ७/०३/२०२३ रोजी धुलीवंदन सण साजरा करण्यात येतो. सदर धुलीवंदनादिवशी मोठ्या संख्येने नागरीक मद्य प्राशन करुन वाहने वेगात व धोकादायकरित्या चालवुन अपघात करुन स्वत:चे तसेच इतरांचे जिवीतास व मालमत्तेस धोका निर्माण करत असल्याने सदर वाहनचालकांवर वेळीच प्रतिबंध करणे गरजेचे आहे.

मा. पोलीस आयुक्त श्री विनयकुमार चौबे यांचे आदेशाने सह पोलीस आयुक्त मनोज लोहिया सो, मा. अपर पोलीस आयुक्त श्री संजय शिंदे सो तसेच पोलीस उपायुक्त काकासाहेब डोळे सो, विवेक पाटील सो. यांचे मार्गदर्शनाखाली पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत पिंपरी चिंचवड वाहतुक शाखेमार्फत उदईक रोजी मद्य प्राशन करुन वाहन चालविणारे वाहनचालकांचे विरोधात दिवसभर ड्रंक ॲण्ड ड्राईव्हची विशेष मोहिम राबविण्यात येणार आहे.

सदर मोहिमेदरम्यान मद्य प्राशन करुन वाहन चालविताना मिळुन येणारे वाहन चालकांवर ड्रंक ॲण्ड ड्राईव्हचे खटले मा. न्यायालयात दाखल करण्यात येणार आहेत.

तरी वाहनचालकांनी मद्यप्राशन न करता वाहने चालवुन होणारी न्यायालयीन कार्यवाही टाळावी असे अवाहन पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयामार्फत करण्यात येत आहे.

(सतिश माने)
सहा.पोलीस आयुक्त,
वाहतुक शाखा,पिंपरी चिंचवड शहर

Scanned with CamScanner